# पुणे महानगरपालिका

## सन २०१६-१७

## महापालिका आयुक्त यांचे निवेदन

**स्थायी समितीचे माननीय अध्यक्ष व सभासद,**

पुणे शहर देशामधील अत्यंत प्रगतिशील शहर असून सुरक्षितता, सामाजिक सलोखा असलेल्या व विकासाच्या दृष्टीने इतर शहरांपेक्षा पुढे असलेले शहर आहे. पुणे शहर हे विद्येचे माहेर घर असून त्यास Oxford of the East म्हणून संबोधिले जाते. पुणे शहर व आजूबाजूच्या परिसरामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगांचे अस्तित्व आहे. Software व Outsourcing निर्यातीच्या क्षेत्रामध्ये पुणे शहर अग्रेसर असून देशामध्ये बेंगलूरू शहरानंतर याच शहराचा दुसरा क्रमांक लागतो.

पुणे शहर झपाट्याने वाढत असून शहराच्या पायाभूत सुविधांवर ताण वाढत चाललेला आहे. स्मार्ट सिटीकडे वाटचाल करताना पुण्याच्या भविष्याबद्दल पुणेकरांमध्ये अपेक्षाही मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. पुणे शहर हे भारतातील सर्वात चांगले राहणीमान असलेले शहर असावे अशी अपेक्षा इथल्या जनमानसाची आहे. या वर्षीचे पुणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक एक अत्यंत महत्वाचा घटक असून त्या माध्यमातून लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

अंदाजपत्रक कोणत्याही स्तरावरच्या सरकारचे असो त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव प्रत्येक नागरिकाच्या जीवनावर पडतो. आजच्या युगात सरकारचे अंदापजत्रक फक्त नियंत्रणाचे वा आर्थिक प्रबंधनाचे साधन न राहता ते आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासाचे आणि समतेचे साधन झाले आहे. राष्ट्रीय आणि क्षेत्रिय अंदाजपत्रकामध्ये झालेल्या सुधारणांच्या अनुषंगाने जगभरात महानगरपालिकेच्या अंदापजत्रकात सुधारणा करण्याचे कार्यक्रम राबविले जात आहेत. अंदाजपत्रकाच्या माध्यमातून फक्त निर्माण करावयाच्या पायाभूत सुविधांचा तांत्रिक व आर्थिक आराखडा अपेक्षित नसून त्यात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना सोईस्कर पध्दतीने सेवा उपलब्ध करून देणे व शहराच्या भविष्याची दिशा दर्शविणाऱ्या तत्वांचा अंतर्भाव करणे सुध्दा अत्यंत महत्वाचे आहे.

अंदाजपत्रक वास्तविक व संरचनात्मकदृष्टया परिपूर्ण असणे, लेखा सिध्दांतानुसार त्याचे वर्गीकरण करणे व परिणामलक्षी असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. अंदाजपत्रकाला दिर्घ वा मध्यम मुदतीच्या नियोजनाचे परिमाण, आटोपशीर, पूर्ण माहिती देणारे व पारदर्शक असणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकात क्षेत्रिय असमतोल दूर करण्यासाठी योग्य निर्देशांक तयार करणे आवश्यक आहे. या अंदाजपत्रकामध्ये प्रभागनिहाय विकासाचा निर्देशांक (WISE Index – Ward Infrastructure, Services and Environment Index) तयार करून समतोल विकासाच्या संकल्पनेचा आधार घेऊन, त्यानुसार प्रभागांना कमी जास्त निधी देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. ही सुधारणा समतोल विकास करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून, याची सुरवात यावर्षी करण्यात आलेली आहे. तसेच या पुढील वर्षामध्ये यात आवश्यक सुधारणा करण्याचा मानस आहे.

पुणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक पारदर्शी, परिणामलक्षी व सर्वसामान्य नागरिकांना वाचता येईल असे, म्हणजेच एकंदरीत स्मार्ट बनविण्याच्या दृष्टीने सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. पहिल्यांदाच अंदाजपत्रक सादर केल्या बरोबर लोकसहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून सदरचे अंदाजपत्रक त्यासाठी खास तयार केलेल्या संकेतस्थळावर लोकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या पुढील वर्षामध्ये महानगरपालिकेचे अर्थसंकल्प व कामकाज व्यवस्थापन पध्दत (Works Management System) यांचा ताळमेळ घालून अंदाजपत्रकाच्या अंमलबजावणीची माहिती सोप्या पध्दतीने सर्वसामान्यांना मिळवून देण्याचा मानस आहे.

## मागील तीन वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

- सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी प्रशासनाने जमा व खर्च बाजूसाठी रक्कम रु. ३९९७/- कोटीचा अंदाजपत्रकीय आराखडा मा. स्थायी समितीस सादर केला होता. मा. स्थायी समितीने जमा व खर्च बाजूमध्ये वाढ करीत रक्कम रु. ४,४७९.५० कोटीचे अंदाजपत्रक मा. मुख्य सभेस सादर केले. मा. मुख्य सभेने हिच रक्कम अंतिम केली.
- अंतिम अर्थसंकल्पातील रक्कमांचा विचार करता दि. ३१.१२.२०१५ अखेर प्रत्यक्ष जमा रक्कम रु. २९३३.०८ कोटी व महसुली खर्च रक्कम रु. १२९१.६४ कोटी, भांडवली खर्च रक्कम रु. ६२१.३२ कोटी असा एकूण खर्च रक्कम रु. १९१२.९६ कोटी एवढा झालेला आहे.
- सन २०१२-१३ ते सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामधील माहे डिसेंबर अखेरचा विभाग निहाय प्रत्यक्ष जमाखर्चाचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| जमा बाजू | डिसेंबर २०१२ अखेर | डिसेंबर २०१३ अखेर | डिसेंबर २०१४ अखेर | डिसेंबर २०१५ अखेर |
|---|---|---|---|---|
| आयातकर/स्थानिकसंस्था कर | ८९९.५९ | ६३७.६५ | ७८८.०२ | ११३४.८३ |
| मिळकतकर | ४४६.११ | ४८०.७४ | ४९९.४६ | ५६९.७८ |
| पाणीपट्टी | ३८.३२ | १०३.४४ | १२४.९ | १३९.७२ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ४९१.५१ | ४८८.२१ | ५१३.२४ | ५७५.०८ |
| इतरजमा | १९६.८१ | २९९.३७ | ३७८.१८ | ४८०.२३ |
| जेएनएनयुआरएम अनुदान | १६.४१ | ४४.९१ | ० | ० |
| शासकीय अनुदान | २५.३५ | २२.६९ | ० | ३३.४४ |
| **एकूण रक्कम रु.** | **२११४.१** | **२०७७.०१** | **२३०३.८** | **२९३३.०८** |

| खर्च बाजू | डिसेंबर २०१२ अखेर | डिसेंबर २०१३ अखेर | डिसेंबर २०१४ अखेर | डिसेंबर २०१५ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | ५४७.११ | ५९१.९३ | ६७३.१३ | ८०२.०३ |
| *प्राथमिक शिक्षण | ११०.६३ | १२४.६ | १३३.९५ | * ० |
| वीजखर्च व दुरुस्ती | ८०.०१ | ८९.०९ | १०८.४ | ८०.४६ |
| पाणीखर्च | ११.८९ | ११.६५ | १०.९१ | १२.०९ |
| कर्जपरतफेड, व्याज व घसारा | २७.२२ | ३५.३८ | ३६.९१ | ३९.८४ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ४७.२१ | ५८.७८ | ५०.१२ | ५३.६३ |
| देखभालदुरुस्ती व इतरखर्च | १४५.७५ | १९१.३३ | २५८.८३ | २९५.२६ |
| वार्डस्तरीयकामे | २.२५ | ५.६ | २.६३ | २.२२ |
| क्षेत्रीयकार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | ८.७५ | १२.७४ | ५.१२ | ६.११ |
| भांडवलीव विकासाची कामे | ३८७.७ | ४७२.६८ | ४६१.८८ | ५२९.७७ |
| जेएनएनयुआरएम | १४७.१८ | १४४.५४ | ७६.२१ | ९१.५५ |
| **एकूण रक्कम रु.** | **१५१५.७** | **१७३८.३२** | **१८१८.०९** | **१९१२.९६** |

सन २०१५-१६ मध्ये प्राथमिक शिक्षण मंडळाकडील खर्च मनपाच्या अन्य खर्चाच्या बाबींमध्ये समाविष्ट.

62

## पुणे महानगरपालिकेने २०१५-१६ मध्ये प्राप्त केलेली विशेष उपलब्धी

- **धनकवडी सातारा रोड उड्डाणपूल** - चव्हाणनगर कमान ते भारती विद्यापीठ दरम्यान सातारा रस्त्यावर २+२ लेनचा १५.९० मी रुंदी व १२९६ मी लांबीच्या उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊन दि. २५/०७/२०१५ रोजी वाहतूकीस खुला करण्यात आला आहे. पुलाखालील जागेतून बी.आर.टी. लेनचे काम पूर्ण करण्यात येऊन तेथून बी.आर.टी. मार्ग कार्यान्वीत झाला आहे. सदर पुलामुळे पुणे सातारा रस्त्यावरील वाहतूकीचा ताण मोठयाप्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे. या पुलास बिल्डर असोशिएशन ऑफ इंडिया (BIAI) चे इन्फ्रास्ट्रक्चर कॅटेगिरीमध्ये सन २०१५ कॉम्पिटीशन मध्ये गौरविण्यात आले आहे.

- **पंडीत नेहरू स्टेडीयम** - पंडीत नेहरू स्टेडीयमच्या संपूर्ण मैदानाचे व पॅव्हेलियन इमारतीमधील तळमजल्यावर असलेल्या प्लेअर्स रुम, मॅनेजर रुम, फ्रंट लॉबी इ. सह संपूर्ण तळमजल्याच्या नुतनीकरणाचे व विद्युतविषयक सुधारणांचे काम पूर्ण करण्यात आले असून या कामासाठी सुमारे र.रु. ४ कोटी इतका खर्च झालेला आहे. मुख्य पीच व्यतिरिक्त मैदानाच्या चारही बाजूला प्रत्येकी सात याप्रमाणे एकूण २८ प्रॅक्टीस पिचेस व आऊट फिल्ड इत्यादीचे काम करण्यात आलेले आहे.संपूर्ण मैदानाचे नुतनीकरण केल्यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागात क्रिकेटसाठी अद्ययावत मैदान उपलब्ध होत आहे.

- **पुणे महानगरपालिका मुख्य भवनाच्या विस्तारित इमारतीचे काम** - पुणे महानगरपालिका मुख्य भवनाच्या विस्तारित इमारतीचे काम सुरू करण्यात आले असून, इमारतीचे बांधकाम १,००,००० चौ फूट असून पार्किंग व्यवस्था ५१,००० चौ.फूट नियोजित आहे. मार्च २०१६ अखेर बेसमेंट पार्किंग वापरासाठी खुले करण्यात येणार आहे. सदर इमारतीचे बांधकाम अस्तित्वातील मुख्य इमारतीस सुसंगत असून बांधकामातील एकसंधता व सारखेपणा जपण्यात आलेला आहे. सदर इमारत दोन मजले पार्किंग, बेसमेंट, तळमजला अधिक चार मजले अशी रचना असून डिसेंबर २०१६ पर्यंत सदरची इमारत पूर्ण करण्याचा मानस आहे.

- **सोमेश्वरवाडी येथील ग्रामसंस्कृती उद्यान** - सोमेश्वरवाडी येथे कै. संजय महादेव निम्हण ग्रामसंस्कृती उद्यानाचे (व्हीलेज पार्क) काम पूर्ण करण्यात आले असून नागरिकांकरिता खुले करण्यात आले आहे. सोमेश्वरवाडी येथील पवित्र श्री सोमेश्वर मंदीरालगत 'इतिहासाच्या पानांत हरवलेलं गाव' पुनःश्च जीवीत झाले आहे. ग्रामसंस्कृतीच्या जीवनशैलीचे व वास्तु शैलीचे दर्शन गावातून फेरफटका मारताना आपल्याला घडणार आहे.

- **सौरऊर्जा निर्मिती** - भविष्यातील वीजेची वाढती गरज व पर्यावरणपूरक दृष्टीकोन विचारात घेता अपारंपारीक उर्जा स्त्रोतांचे वापरास चालना देणे अनिवार्य ठरते. पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर सोलर पॅनेल बसविणेसाठी प्राथमिक स्वरुपात १९ इमारतींची पाहणी विद्युत विभाग व भवन विभागाने केली असता उपलब्ध सावली विरहीत छताचे क्षेत्र विचारात घेता अंदाजे १ MW पर्यंत म्हणजेच अंदाजे वार्षिक १५ लाख युनिटची वीजनिर्मिती करणे शक्य होणार असून यामुळे पुणे मनपाची सुमारे रक्कम रुपये ६० लाख प्रतिवर्ष बचत होऊ शकते.

- **पुणे मनपा कोंढवा कत्तलखाना** - पुणे मनपाचे कोंढवा कत्तलखाना येथे आधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. सदर अत्याधुनिक प्रयोगशाळेत अन्न व अन्नपदार्थ, पाणी, सुअरेज वॉटर तसेच मांस व मांसजन्य पदार्थांची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून या प्रयोगशाळेस ISO:9001:2008 प्रमाणपत्र व अन्न सुरक्षा कायदा, २००६ अन्वये केंद्र शासनाचे NABL Accreditation (National Accreditation Board for Testing & Calibration Laboratories) मानांकन प्राप्त झाले आहे.

प्रयोगशाळेस NABL Accreditation प्राप्त करणारी पुणे महानगरपालिका ही देशातील पहिली महानगरपालिका ठरली असून त्यामुळे महानगरपालिकेच्या वैभवात भर पडली आहे. क्वॉलिटी अॅशुरन्स लॅबोरेटीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या प्रयोगशाळेप्रमाणे शुल्क आकारण्यात येणार आहे. सदर शुल्कास मा. स्थायी समिती व मा. मुख्य सभेने मान्यता दिली असून प्रयोगशाळेपासून पुणे मनपास उत्पन्न मिळत आहे.

- **अपारंपारीक उर्जा क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कामगिरीकरीता असोसिएशन ऑफ रिन्युएबल एनर्जी (AREAS) यांचे प्रशस्तिपत्रक** –सन २०१५-१६ मध्ये पुणे मनपास रिन्युएबल एनर्जीमध्ये वैशिष्टयपूर्ण काम केल्याबद्दल असोसिएशन ऑफ रिन्युएबल एनर्जी (AREAS) यांचे तर्फे खाली नमूद केलेल्या कामांसाठी बक्षिस मिळाले आहे.

# विकास योजना प्रगती आढावा:-

## (१) पाणी पुरवठा

### सन २०१५-१६

- सन २०१५-१६ करिता मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागासाठी महसुली कामांसाठी र.रु. २५३.१४कोटी व भांडवली कामांसाठी र.रु. २४७.७२ कोटी अशी एकूण र.रु. ५००.८६ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीचे अनुषंगाने सन २०१५-१६ करिता पाणीपट्टीपोटी र.रु.८० कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत पाणीपट्टीपोटी र.रु. ४२.१० कोटी जमा झालेले आहेत. या अंदाजपत्रकामध्ये मुख्यत्वेकरुन जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मान्य झालेल्या पाणी पुरवठा योजना तसेच कालव्यातून उचलण्यात येणारे पाणी बंद करण्यासाठी बंद नळ योजना व सुरू असलेले वारजे जलकेंद्र व त्यासाठी दाबनलिका टाकणे इत्यादी कामांसाठी तरतूद करण्यात आली होती.

**सन २०१५-१६ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नावीन्यपूर्ण योजना/प्रकल्प**

- सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये भामा-आसखेड योजनेअंतर्गत सर्व सहा पॅकेजेस्ची कामे सुरू करण्यात आली असून अंदाजे २५% काम पूर्ण झाले आहे.तसेच वडगांव येथे बांधावयाचे जलशुध्दीकरण केंद्र व त्यासाठी आवश्यक रॉवॉटर पंपिंग स्टेशनची कामे ७०% पूर्ण झाली असून, सदरची योजना माहे मार्च, २०१६ मध्ये कार्यान्वित करणे शक्य होणार आहे. तसेच खडकवासला धरण ते पर्वती जलकेंद्र दरम्यान टाकण्यात येत असलेल्या दाबनलिकेचे काम सुध्दा प्रगतीपथावर असून, सदरची योजना माहे जून, २०१६ मध्ये कार्यान्वित करणे शक्य होणार आहे. या व्यतिरिक्त पर्वती येथे बांधण्यात येत असलेल्या ५०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर असून, अंदाजे ४०% काम जागेवर पूर्ण करण्यात आलेले आहे. पुणे शहरास समान पाणीवाटप करणेकामी सन २०४७ सालच्या गरजा लक्षात घेऊन 'बृहत् आराखडा' तयार करण्यात आला आहे. र.रु. २८१८ कोटी एवढया अंदाजित खर्चाची योजना येत्या ५ वर्षाचे कालावधीमध्ये राबविण्याचा मानस आहे. वारजे येथे बांधण्यात आलेल्या २०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र व त्या अनुषंगाने टाकण्यात आलेली दाबनलिका व जॅकवेलचे काम पूर्ण करून, सदरची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

### सन २०१६-१७

### (तरतूद रक्कम रु.महसूली ३३२.८६ कोटी व भांडवली ६३६.८६ कोटी)

- या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये पहिल्यांदा शहरी पाणीपुरवठा निधीची (Urban Water Fund) संकल्पना मांडण्यात आली आहे. पाणीपुरवठ्याच्या दरामध्ये सूचीत केलेल्या दर वाढीच्या माध्यमातून प्राप्त होणारे वाढीव उत्पन्न, शासनाकडून मिळणारे अनुदान व कर्ज स्वरूपात प्राप्त होणारा निधी हे स्वतंत्र खात्यामध्ये ठेऊन त्यातून फक्त सन २०४७ पर्यंत पुणे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी आवश्यक असलेला समतोल पाणी पुरवठा प्रकल्प यासाठी निधी खर्च करण्याचा मानस आहे. शहरी पाणीपुरवठा निधीची (Urban Water Fund) रचना खालील प्रमाणे आहे.

| जमा बाजूचा तपशिल | खर्च बाजू तपशिल |
|---|---|
| सन २०१६-१७ मध्ये मीटर व करपात्र रक्कमेच्या पाण्याच्या दरातील प्रस्तावित वाढीमुळे अंदाजे मिळणारे अतिरिक्त उत्पन्न | पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने समान पाणी पुरवठा करणे ( २४ X ७ चा खर्च) |
| जागतिक बँक, एशियन डेव्हलपमेंट बँक, जपान बँकेकडून अथवा अन्य बँका व वित्त संस्था यांचेकडून दिर्घ व लघु मुदतीसाठी कर्ज | |
| अमृत व स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान | |

- सन २०१६-१७ करिता महसूली तरतूद र.रु. ३६६.६२ कोटी व भांडवली कामासाठी र.रु. ४४०.८४ कोटी अशी एकूण र.रु. ८०७.४६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदींमध्ये मुख्यत्वेकरुन पर्वती येथे नव्याने बांधण्यात येत असलेल्या जलशुध्दीकरण केंद्रासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. तसेच पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्र दरम्यान टाकण्यात येणाऱ्या २२०० मि.मि. व्यासाच्या दाबनलिकेसाठी सुध्दा मोठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये पाणीपट्टीपोटी असलेली थकबाकी वसूल करणेबाबत मोठ्या प्रमाणात मोहिम हाती घेण्यात येणार असून, पाणीगळती कमी करणे, अनधिकृत नळजोड शोधून कारवाई करणे इत्यादी कामांवर भर देण्यात येणार आहे.

- **सन २०१६-१७ मधील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना.**

  या वर्षी पुणे शहरामध्ये पाऊस पुरेशा प्रमाणत न पडल्यामुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पुणे शहराची पाणी पुरवठा व्यवस्था अत्यंत जुनी असून त्यात अनेक त्रुट्या असल्यामुळे शहराला समान व योग्य पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. पुण्यासारख्या प्रगतशिल शहराला हे शोभणारे नाही. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेने समान पाणी पुरवठा करण्यासाठी तयार केलेला प्रकल्प अहवालानुसार ज्याला मा. मुख्य सभेची ठराव क्र. ६०, दिनांक २२.०५.२०१५ प्रमाणे मान्यता मिळालेली आहे, त्या योजनेचा या वर्षी शुभारंभ करण्याचा व येत्या पाच वर्षात सदरची योजना पूर्ण करण्याचा मानस आहे.

  समान पाणी वाटप योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेल्या काही महत्वाचे घटक उदा. साठवण टाक्या व त्यास आवश्यक असलेल्या दाबनलिका टाकण्याचे काम यंदाचे वर्षी हाती घेण्यात येणार आहे. पुणे शहरास बंद नलिकेतून पाणीपुरवठा करणेचे योजनेचे काम सुरू करण्यात आले असून, योजना माहे जून, २०१६ मध्ये कार्यान्वित करणेत येणार आहे. यामुळे कालव्यातून घेण्यात येणारे पाणी बंद नलिकेतून घेणार असल्यामुळे साधारणतः १ टीएमसी पाण्याची बचत होणार आहे. तसेच जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेले वडगांव येथील १२५ द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र सुध्दा माहे मे, २०१६ मध्ये कार्यान्वित करणेत येणार आहे. यामुळे धनकवडी, कात्रज, आंबेगांव, धायरी या भागातील पाणीपुरवठयामध्ये सुधारणा होणार आहे. तसेच पर्वती जलशुध्दीकरण केंद्र ते लष्कर जलकेंद्र दरम्यान टाकण्यात येणाऱ्या २२०० मि.मि.व्यासाच्या दाबनलिकेचे अंदाजे ७०% काम पूर्ण करणे अपेक्षित आहे.तसेच पर्वती येथे बांधण्यात येत असलेल्या जलशुध्दीकरण केंद्राचे काम यावर्षी पूर्ण करण्याचा मानस आहे.

## (२) मलनि:सारण

### सन २०१५-१६

- मलनि:सारण विभागासाठी मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकातील र.रु. १०१.२२ कोटी महसूली कामांस व र.रु. १२१.२७ कोटी भांडवली कामांसाठी अशी एकूण र.रु. २२२.४९ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीमध्ये सुरु असलेल्या मलनि:सारण प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्यात आलेले आहे.

**सन २०१५-१६ मधील महत्त्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नावीन्यपूर्णयोजना/प्रकल्प**

- पुणे मनपा व पाटबंधारे विभागांतर्गत झालेल्या करारानुसार ६.५ टीएमसी पाणी शेतीसाठी उपलब्ध करुन देणेची योजना माहे ऑक्टोंबरमध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे.

- शहरात निर्माण होणाऱ्या संपूर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडणेसाठीची योजना केंद्र शासनाचे E.F.C. (Expenditure Finance Committee) मार्फत मंजूर करून घेण्यात आली असून, 'भारत सरकार' व 'जायका, जपान' या संस्थेअंतर्गत कर्ज योजनेच्या करारावर १२ जानेवारी, २०१६ रोजी स्वाक्षरी झालेली आहे. एकूण रक्कम रूपये ९९०.२८ कोटी पैकी केंद्र शासनाकडून ८४१ कोटी एवढे अर्थसहाय्य पुणे महानगरपालिकेस अनुदान स्वरूपात मिळणार आहे. सदर योजनेची अंमलबजावणी पुढील आर्थिक वर्षात (सन २०१६-१७) सुरु करणे शक्य होणार आहे.

**सन २०१६-१७**

**(तरतूद रक्कम रु.भांडवली १६०.६२ कोटी व महसुली ४७.५८ कोटी)**

- सन २०१६-१७ या वर्षासाठी महसूली कामांसाठी र.रु. १६०.६२ कोटी व भांडवली कामांसाठी र.रु.४७.५८ कोटी असे एकूण र.रु.२०८.२० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात, शहरात निर्माण होणाऱ्या संपूर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडणे या योजनेची कामे सुरु करण्याबाबत भर देण्यात येणार आहे.

- **सन २०१६-१७ मधील करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना.**

सन २०१६-१७ साली केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानापोटी येणाऱ्या रकमेतून प्रस्तावित ११ मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे (३९६ द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेचे) उभारण्याची कामे सुरू करण्यात येणार आहेत. या व्यतिरिक्त योजनेमध्ये सुचीत केल्याप्रमाणे चार मैलापाणी पंपिंग स्टेशनची क्षमता वाढविण्याची कामे सुरू करण्यात येणार आहेत. नवीन मलवाहिनी टाकण्याचे कामासाठी आवश्यक ते डिझाईनचे काम पूर्ण करुन पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये सदर कामाचा अंतर्भाव करण्यात येणार आहे.

## (३) घनकचरा व्यवस्थापन

**सन २०१५-१६**

- सन २०१५-१६ मधील अंदाजपत्रकातून महानगरपालिका हद्दीतील घनकचरा महानगरपालिका क्षेत्रातच जिरविण्याच्या दृष्टीने विकेंद्रीत पध्दतीचे प्रकल्प हाती घेण्यात आले असून यात कमी जागेत व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेण्यात आले असून यात ५४.५ मे.टन क्षमतेचे प्रकल्प सुरू करण्याचे नियोजन असून त्यातील ८.५ मे.टन क्षमतेचे प्रकल्प मध्यवस्तीच्या भागात सुरू झालेले आहेत. ४६ मे.टन क्षमतेचे प्रकल्पांचे काम मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच मिश्र कचऱ्यावर प्रक्रियेसाठी ५० मे.टन क्षमतेचा प्रकल्प पूर्ण करून कार्यान्वित करण्यात आलेला आहे. बी.ओ.टी. तत्वावर ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅस - बायो.सी.एन.जी करण्याचा ३०० मे. टन क्षमतेचा कचऱ्याचा प्रकल्प उभारण्यात आला असून सध्या ४० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत असून जानेवारी २०१६ अखेर ३०० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे नियोजन आहे. तसेच ५०० मे.टन क्षमतेचा मिश्र कचरा प्रकल्प उभारण्याची सुरवात करण्यात आली आहे व हा प्रकल्प डिसेंबर २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचा मानस आहे.

- शास्त्रीय भू-भरावासाठी विविध जागांची पाहणी करून जागा म.न.पा.स मिळणेबाबत कार्यवाही सुरू असून मौजे मोशी येथील जागेचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे मार्फत शासनास सादर झालेला आहे. मौजे पिंपरी सांडस येथील वन विभागाची जागा ताब्यात घेणेबाबत कार्यवाही प्रगती पथावर आहे. मौजे शिंदवणे येथील जागा ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

- देवाची ऊरूळी/फुरसुंगी येथील कॅपिंगचे उर्वरीत काम हाती घेण्यात आले आहे. तसेच सदर ठिकाणी शास्त्रीय भू-भराव करण्याचे काम नियोजित आहे.

- शुन्य कचरा वॉर्ड प्रणालीचा ठराव मान्य झाला असून त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

- जनजागृती मार्फत पोस्टर व युएफओ मार्फत विविध चित्रटपटगृहात जनजागृती चित्रफिती दाखविण्यात आल्या आहेत. या वर्षी व पुढील दोन वर्षामध्ये घनकचरा व्यवस्थापनाबद्दल नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती निर्मित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

- स्वच्छ संस्थेसोबत दिनांक ०१.०१.२०१६ रोजी करण्यात आलेल्या कराराप्रमाणे पुणे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत असणारे सर्व घरे, व्यापारी संकुल, कार्यालये व इतर मालमत्तांमधून घरोघरी कचरा गोळा करण्याचे काम सुक्ष्म नियोजनाच्या आधारावर करण्याचा मानस आहे.

- पुणे शहरात कन्व्हेअरच्या सहाय्याने विभाजन करून त्यातील कचरा वेगळा केला जाण्यासाठी कन्व्हेअर बसविण्यात येणार आहेत.

- वेगळे केलेल्या प्लॅस्टिक पासून रस्ते बनविण्याचे तंत्रज्ञानाची माहिती घेऊन पथ विभागाच्या सहाय्याने रस्त्यांमध्ये प्लॅस्टिकचा वापर करण्याचे उद्दीष्ट आहे.

- प्लॉस्टिकचा कचरा ही आपल्या समाजामध्ये एक मोठी समस्या निर्माण झाली असून ती कमी करण्याकरीता त्याची मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे प्रस्तावित आहे. तसेच प्लॉस्टिक कचऱ्यापासून तेल निर्माण करणे अशा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याचा मानस आहे.

## स्वच्छ भारत अभियान

- स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत पुणे शहरास सन २०१६ अखेर कचरा मुक्त दि. ०२.१०.२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त करण्याचा मानस आहे. जुलै, २०१५ मध्ये महापालिकेने केलेल्या सर्व्हेनुसार एकूण २८,५७२ वैयक्तिक शौचालय बांधण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

- २ ऑक्टोबर, २०१४ पासून आजपर्यंत १५५० वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झालेले असून मार्च २०१६ पर्यंत नवीन ४,००० वैयक्तिक शौचालये बांधण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असून त्याप्रमाणे क्षेत्रिय स्तरावर अंमलबजावणी सुरू आहे. मा. मुख्य सभेने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात ५.३० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करून दिले आहे. स्वयंसेवी संस्था व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हे उद्दीष्ट पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

- **मार्च २०१६ अखेर पूर्ण होणाऱ्या कामाचा तपशिल –**

  १. ३०० मे. टन क्षमतेचे बायोमिथेनायझेशन चे युनिट कार्यान्वित करणे.
  २. रोकेम प्रकल्पाची क्षमता २०० मे. टनावरून ४०० मे. टनापर्यंत वाढविणे.
  ३. शहरामध्ये मायक्रोऑरगॅनिझम तंत्राचे ५४ मे. टन क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित करणे.
  ४. कचरा विलगीकरण व खत निर्मीतीचा ५० मे. टन क्षमतेने प्रकल्प कार्यान्वित करणे.
  ५. सीएसआर च्या माध्यमातून १० मे. टन क्षमतेचे ६ क्रशिंग युनिट कार्यान्वित करणे.
  ६. कचरा वर्गीकरणाकरिता १५ ठिकाणी सॉर्टिंग शेड कार्यान्वित करणे.

## सन २०१६-१७

## (तरतूद रक्कम रुपये भांडवली -६८.३० कोटी व महसुली ३३६.५३ कोटी)

- **अल्प मुदतीमध्ये करावयाची कामे –**

  १. स्वच संस्थेबरोबर केलेल्या कराराप्रमाणे १००% मिळकतींमधून कचरा गोळा करण्याची प्रक्रिया करणे.
  २. पिंपरी सांडस येथील जागा ताब्यात घेऊन शास्त्रोक्त पध्दतीने भू-भराव क्षेत्र निर्मित करण्याचे काम हाती घेणे.
  ३. शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर दैनंदिन स्वच्छतेसाठी मेकॅनिकल स्वीपरचा वापर करणे.
  ४. राडारोड्याचा प्रकल्प सुरु करणेची कार्यवाही करणे.

- **मध्यम मुदतीमध्ये करावयाची कामे – डिसेंबर २०१६ अखेर.**
  १. कॅपिंगचे काम पूर्ण करणे.
  २. शास्त्रोक्त भू-भरावाचे काम सुरु करणे.
  ३. रोकेम प्रकल्पाची क्षमता ७०० मे. टन पर्यंत वाढविणे.
  ४. ५०० मे. टन क्षमतेच्या मिश्र कचऱ्यावर आधारीत प्रकल्प कार्यान्वित करणे.
  ५. बायोगॅस प्रकल्पांची संख्या २१ वरून २५ पर्यंत वाढविणे.
  ६. आवश्यक त्या प्रमाणात शहरामध्ये विकेंद्रीत घनकचरा व्यवस्थापन केंद्रे उभारणे.

- **दिर्घ मुदतीमध्ये करावयाची कामे.**
  १. हडपसर, कोंढवा, आंबेगाव येथील आरक्षणाच्या जागा ताब्यात घेणे.
  २. हडपसर, कोंढवा व आंबेगाव येथील जागांवर प्रकल्प उभारणीबाबत प्रस्ताव करून कार्यवाही करणे. (याकरीता जागा ताब्यात आलेनंतर किमान १८ महिने कालावधी लागणार आहे.)
  ३. पिंपरी सांडस येथील जागा ताब्यात आल्यानंतर त्याठिकाणी भू-भरावाचा विकास करणे. (टेंडर कार्यवाही व भू-भराव क्षेत्र निर्माण करणेकरीता किमान १ वर्षे कालावधी जागा ताब्यात आल्यानंतर लागणार आहे.)

**स्वच्छ भारत अभियान**

- पुणे महानगरपालिकेने २ ऑक्टोबर २०१७ पर्यंत १००% वैयक्तिक शौचालय बांधण्याचे नियोजित केले असून सन २०१६-१७ मध्ये याकामासाठी र.रू. १० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.
- त्या व्यतिरिक्त सीएसआरच्या माध्यमातून पब्लिक टॉयलेट स्वच्छ करणे, बांधकाम करणे, जाहिरातीचे हक्काद्वारे त्यांचे दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे इ. बाबत नियोजन आहे.
- कम्युनिटी टॉयलेट व पब्लिक टॉयलेट यांच्या स्वच्छतेबाबत धोरण तयार करणे व त्यानुसार सीएसआरच्या माध्यमातून अंमलबजावणी करणे.
- पुणे महानगरपालिकेमार्फत यंत्राद्वारे टॉयलेटची स्वच्छता करणेसाठी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयासाठी एक याप्रमाणे १५ वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
- पुणे शहरात सॅनिटरी नॅपकिन डिस्पोझर मशिन प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयासाठी एक याप्रमाणे बसविण्याचे नियोजन आहे. त्यामध्ये जनजागृती, संकलन, वाहतूक व डिस्पोझल करणेचे नियोजन करण्यात येणार आहे.
- घनकचरा व्यवस्थापन व शौचालयांची निर्मिती करताना समाजामध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याची आवश्यकता असते, त्यासाठी येत्या तीन वर्षात मोठ्याप्रमाणात मोहिम हाती घेण्याचा मानस आहे. तसेच या कामांना वेळेवर पूर्ण करण्याकरिता, सनियंत्रण व पर्यवेक्षण करण्याकरिता तज्ञांचा समावेश करून मनपात स्वतंत्र Project Management Unit (PMU) तयार करण्यात येणार आहे.

## (४) आरोग्य

**सन २०१५-१६**

- **वैद्यकीय सेवा** – पुणे मनपाचे दवाखाने व रुग्णालयांमध्ये माहे एप्रिल २०१५ ते डिसेंबर २०१५ अखेर एकूण ११,३५,०९० रुग्णांनी बाह्यरुग्ण सेवेचा लाभ घेतला असून ३६,६०८ रुग्णांनी आंतररुग्ण सेवेचा लाभ घेतला आहे. तसेच लहान-मोठ्या स्वरुपाच्या एकूण ३,४६५ शस्त्रक्रीया पुणे मनपाचे रुग्णालयांमध्ये करण्यात आल्या आहेत. जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत एकूण १२,५५९ गरोदर मातांनी प्रसुतिपूर्व वैद्यकीय सेवेचा (ए.एन.सी.) लाभ घेतला. तसेच एकूण ५,१५९ मातांची प्रसुति मोफत करण्यात आली आणि गरोदर मातांना व त्यांचे नवजात अर्भकांना मोफत औषधोपचार पुरविण्यात आले.

- **वैद्यकीय सहाय्य योजना** – पुणे महानगरपालिकेचे शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजने अंतर्गत माहे एप्रिल २०१५ ते डिसेंबर २०१५ अखेर आर्थिक दुर्बल गटातील एकूण ७८६० सभासदांनी व त्यांचे कुटुंबीयांनी योजनेचा लाभ घेतला.
- **आरोग्य परवाने** – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत अंतर्भुत असलेल्या तरतुदींनुसार सन २०१५-१६ मध्ये माहे डिसेंबर २०१५ अखेर आरोग्य विषयक विविध प्रकारचे एकूण ६३४ परवान्यांचे नुतनीकरण करण्यात आले असून ११ नवीन परवाने देण्यात आले आहेत.
- **नर्सिंग होम रजिस्ट्रेशन** – नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार पुणे महानगरपालिकेमार्फत एकूण ३०३ नर्सिंग होम परवान्यांचे नुतनीकरण करण्यात आले असून १२ नवीन नर्सिंग होम परवाने देण्यात आले आहेत.

**सन २०१५-१६ मधील महत्वाच्या पूर्णत्वास / सुरू असलेले नाविन्यपूर्ण प्रकल्प –**

- **डायलिसिस केंद्र** – वाढते शहरीकरण व यामुळे निर्माण होणारी स्पर्धा, धकाधकीची शहरी जीवनशैली याअनुषंगाने मानवी जीवनावर होणारे विपरीत परीणाम व वाढते ताण-तणाव यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक अनेक समस्यांपैकी एक म्हणजे शहरामध्ये किडनीविषयक रूग्णांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. सध्या शहरामध्ये अंदाजे सुमारे २००० रूग्ण किडनीविषयक आजाराने त्रस्त असल्याने शहराच्या विविध खाजगी व शासकीय रूग्णालयांमध्ये डायलिसिसची सुविधा घेत आहेत. रूग्णांची मोठ्या प्रमाणावर असणारी संख्या व कमी प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या डायलिसिस सुविधा केंद्रांची संख्या लक्षात घेता कित्येक रूग्णांना वेळेवर डायलिसिसची सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच या डायलिसिस सुविधेसाठी खाजगी रूग्णालयामध्ये असणारे दर सर्वसामान्य रूग्णांना न परवडणारे असल्यामुळे रूग्णांना सरकारी रूग्णालयांवर अवलंबून रहावे लागते. सरकारी रूग्णालयांवर असणारा ताण विचारात घेता अशा स्वरूपाच्या रूग्णांना वेळेत सेवा उपलब्ध न झाल्याने व पुरेशा प्रमाणात डायलिसिस न झाल्याने मृत्यू होण्याचा धोका वाढतो. किडनीविषयक आजार असणाऱ्या अनेक रूग्णांना किडनी प्रत्यारोपण हा एकमेव पर्याय शिल्लक असतो व तोपर्यंत त्यांना डायलिसिसवर पूर्णपणे अवलंबून राहावे लागते. याकरीता दि.१ ऑक्टोबर २०१५ रोजी पासून पुणे महानगरपालिका व सौ. अरूणा नाईक डायलिसिस युनिट लायन्स क्लब ऑफ पूना, मुकूंदनगर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब व गरजू रूग्णांना सवलतीच्या दरात डायलिसिसची सुविधा कमला नेहरु रुग्णालय, मंगळवार पेठ, पुणे ११ येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेच्या या संयुक्त प्रकल्पाद्वारे गरीब व गरजू रुग्णांना डायलेसिसची सुविधा सुरवातीला दोन शिफ्टमध्ये व कालांतराने सदरची सुविधा २४ तास उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर प्रकल्प २४ तास चालविण्याकरिता आर्थिक पाठबळ लागणार असल्यामुळे डायलेसिसची सुविधा पुर्णपणे मोफत न ठेवता मा. स्थायी समितीने पारित केलेल्या ठरावानुसार गरीब व गरजु रुग्णांना अत्यंत वाजवी दरामध्ये डायलेसिसची सुविधा र.रु. ४००/- (विना कन्झ्युमेबल्स) आकारून देण्यात येणार असून १००० रूग्णांना माफक दरात सुविधा पुरवण्यात आल्या आहेत.
- **नवीन दवाखाने** – दि.११/१२/२०१५ रोजी प्रभाग क्र. ७० अ, स्व.राजीव गांधी शॉपींग कॉम्पलेक्स, बिबवेवाडी येथे आरोग्य खात्यामार्फत नव्याने श्री सद्गुरू शंकर महाराज दवाखाना सुरू करण्यात आला आहे. सदर दवाखान्यामध्ये बाह्यरुग्ण विभाग, लसीकरण, राष्ट्रीय कार्यक्रम राबविणे (उदा. क्षयरोग, कुष्ठरोग निर्मुलन, एड्स, माताबाल संगोपन इ.) तसेच कुटूंब कल्याण केंद्रांमार्फत गर्भ निरोधक गोळया, निरोध वाटप, तांबी बसविणे, लोहयुक्त गोळ्यांचे वाटप इ. वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. आजअखेर पुणे शहरामध्ये पुणे मनपाचे ३९ दवाखाने, १५ प्रसुतिगृह, १ सर्वसाधारण रुग्णालय व १ सांसर्गिक रोगांचे रुग्णालय कार्यरत आहेत.

  आर ७ अंतर्गत ताब्यात आलेली खराडी येथील रूग्णालयाची इमारत निविदा प्रक्रियेद्वारे भाडे तत्वावर देण्यात आली असून सदर रूग्णालयामध्ये पुणे शहरातील शहरी गरीब रूग्णांना 'शहरी गरीब योजनेचा' व मनपातील अधिकारी कर्मचारी यांना 'अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेचा' लाभ मिळणार आहे.

  महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येरवडा येथे बाह्यरूग्ण विभाग सुरू करण्यात येणार आहे.

- **नवीन सोनोग्राफी केंद्र** –सन २०१५-१६ मध्ये पुणे महानगरपालिकेचे कै. सखाराम कुंडलीक कोद्रे प्रसुतिगृह मुंढवा, डॉ. दळवी रुग्णालय, शिवाजीनगर व भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णालय येरवडा या ३ ठिकाणी नव्याने सोनोग्राफी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. अशा प्रकारे आजअखेर पुणे मनपाचे दवाखाने व रुग्णालयांमध्ये एकूण ९ सोनोग्राफी केंद्रे कार्यरत आहेत.

- **मासळी मार्केटचे आधुनिकीकरण** – गणेशपेठ येथील सध्याचे मार्केट पाडून त्याठिकाणी नव्याने आधुनिक मासळी मार्केट उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय मत्सिकी विकास महामंडळाकडून प्रकल्प खर्च रु.२५० लाख गृहीत धरुन ९० टक्के अनुदान पुणे मनपास प्राप्त होणार आहे. त्यापैकी र.रु.१००.७५ लाख इतके अनुदान पुणे मनपास प्राप्त झाले आहे. गणेश पेठ मासळी मार्केटचे आधुनिकीकरण पूर्ण झाल्यानंतर गाळाधारकांना आरोग्यदृष्टया सर्व सोयी कोल्ड स्टोरेजची व्यवस्था तसेच व्यावसायिकांना व नागरिकांना पार्किंगची सोय उपलब्ध होणार आहे.

**सन २०१६-१७**

**(तरतूद रक्कम रु. भांडवली १७.६७ कोटी व महसुली १८९.६६ कोटी)**

- **कुष्ठ रुग्णांना अर्थ सहाय्य** – कुष्ठरोगाची लागण झालेल्या रुग्णांमध्ये सदर रोग बळावून अकार्यक्षमता निर्माण होऊन अपंगत्व येण्याची शक्यता असते. सबब, पात्र रुग्णांना पुणे महानगरपालिकेमार्फत दरमहा रु.१,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

- **नवजात अर्भकांची BERA Test** – अपंगत्वावर वेळीच आवश्यक उपचार होण्याच्यादृष्टीने पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये जन्मास येणाऱ्या, सर्व नवजात अर्भकांची मेंदु श्रवण प्रतिसाद तपासणी BERA Test (Brainstem auditory evoked response audiometry) द्वारे करण्यात येईल.

- **नवीन प्रसुतिगृह** – मित्रमंडळ चौक येथे आर ७ अंतर्गत ताब्यात येणाऱ्या जागेमध्ये प्रसुतिगृहाच्या इमारतीचे काम पुर्णत्वास आले असून येथे २० खाटांचे प्रसुतिगृह व बाहयरूग्ण विभाग सुरू करण्यात येईल, ज्याचा फायदा नजिकचे परिसरातील सुमारे १ लाख लोकसंख्येकरिता होईल.

- **नवीन दवाखाने** –वडगांव शेरी येथे बाहय रूग्ण विभाग व प्रयोगशाळा, सिंहगड रोड राजयोग सोसायटी येथे बाहयरूग्ण विभाग सुरू करण्यात येणार आहे. या प्रत्येक बाहय रूग्ण विभागाचा फायदा नजिकचे परिसरातील सुमारे ५० हजार लोकसंख्येकरिता होईल.

- **नवीन सोनोग्राफी केंद्र** –पुणे मनपाचे कै. थरकुडे दवाखाना एरंडवणा व कै. पृथक बराटे दवाखाना रामनगर या दोन दवाखान्यांमध्ये सोनोग्राफी केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

- **अर्बन कम्युनिटी मेंटल हेल्थ कार्यक्रम** – झोपडपट्टी क्षेत्रातील लोकांचे मानसिक आरोग्य सक्षम होण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिका व बापू ट्रस्ट फॉर रिसर्च ऑन माईड अ‍ॅन्ड डिस्कोर्स यांचे संयुक्त विद्यमाने 'अर्बन कम्युनिटी मेंटल हेल्थ' हा कार्यक्रम प्रस्तावित करण्यात आला आहे. प्रथमतः हा कार्यक्रम पाच प्रभागामध्ये प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणार आहे.

- **नवीन प्रकल्प** –

  १. कै. चंदुमामा सोनवणे प्रसुतिगृह येथे संयुक्त विद्यमाने ३ बेडचे डायलेसिस युनिट कार्यान्वित करण्यात येऊन सर्व सामान्य रूग्णांना परवडेल अशा रू. ४००/- प्रति डायलेसिस या माफक दराने डायलेसिस सुविधा सुरू करण्यात येणार आहे.

  २. वारजे येथे सुमारे २ एकर जागेवर पीपीपी तत्वावर मल्टीस्पेशालिटी अद्ययावत रूग्णालय उभारण्यात येवून सर्व सामान्य रूग्णांना शासकीय दराने वैद्यकीय सेवेचा लाभ मिळणार आहे.